**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९३/२०१९** | **दिनांक १९/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,** विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग, ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,** नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग, ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,** तांत्रिक अधिकारी, कृषिविदया विभाग, ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/११/२०१९ ते १९/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/११/२०१९ सकाळी ८:३० पासून २४/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३/११ | १४/११ | १५/११ | १६/११ | १७/११ | १८/११ | १९/११ | | २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ |
| ०.० | ०.० | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.५ | ३३.४ | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३६ | ३६ | ३५ | ३७ |
| २३.४ | १९.० | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २२ | २२ | २३ | २३ | २३ |
| ४ | ० | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ३ | २ | ३ | ४ |
| ८७ | ८४ | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६६ | ६९ | ७३ | ७३ | ६८ |
| ४५ | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४१ | ४३ | ४९ | ४९ | ४४ |
| २.१ | १.६ | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ६ | ७ | ७ | ७ |
| शांत | शांत | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ५२२२.१ | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २० ते २४ नोव्हेंबर, २०१९ दरम्यान कमाल तापमानात वाढ संभवत असून आकाश अंशत: मेघाच्छादित राहील**

**दिनांक २२ ते २८ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पूर्व मशागत व पेरणी** | • रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी पूर्व मशागतीची कामे करण्यास सुरवात करावी.<br>• भात रोपवाटीकेसाठी गादी वाफे तयार करावेत. प्रथम जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, १ मी. x १० मी. अंतराचे गादीवाफे तयार करावे वाफ्यांना प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे.<br>• उन्हाळी भात लागवडीसाठी कर्जत-१८४, रत्ना, रत्नागिरी-१, रत्नागिरी-७४, रत्नागिरी-२४, रत्नागिरी-७११, कर्जत-१, कर्जत-३ या जातींचे बियाणे वापरावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो प्रमाणात थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती गुंठा क्षेत्रास ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **भुईमुग** | **पूर्व मशागत** | • रब्बी भुईमुग लागवडीसाठी शेताची पूर्व मशागतीची कामे करण्यास सुरवात करावी. रब्बी भुईमुग लागवडीसाठी कोंकण गौरव, टी. जी. २६, कोंकण ट्रोम्बे टपोरा एस बी. ११, टी.ए.जी.- २४, फुले प्रगती या जातींचे बियाणे १०० ते १२५ किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात उपलब्ध करून घ्यावे. |
| **आंबा** | **पालवी** | • आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. पहिल्या वर्षी आठवडयातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी द्यावे. |
| **नारळ** | **-** | • वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या बागेस ६ ते ७ दिवसांच्या आणि पूर्ण वाढलेल्या माडास जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **पांढरा कांदा** | **रोपवाटिका** | • रब्बी हंगामासाठी पांढरा कांदा लागवडीसाठी रोपवाटिका तयार करावी. रोपे तयार करण्याकरिता रोपवाटिका क्षेत्राची खोल नांगरट करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून कांदा पिकाच्या बियाणांची पेरणी करावी. पेरणीनंतर हलके पाणी दयावे. |
| **भेंडी** | **पेरणी** | • भेंडी पिकाची लागवड जमिनीची नांगरट करून सरी पद्धतीने ४५ x १५ सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५० किलो |

| | | |
|---|---|---|
| | | शेणखत, ७०० ग्रॅम युरिया, ३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश प्रती गुंठा खताची मात्रा द्यावी. पेरणीनंतर हलके पाणी दयावे |
| **वांगी** | **रोप अवस्था** | • वांगी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पाने लहान राहणे या रोगापासून संरक्षण करण्याकरीता पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. आणि अक्रोमायसिन ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवून लागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ४३ किलो युरिया १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**• अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |